. ग्रं. सं. ठाणें
काव्य
पु ५५
१०२२२

॥ ... प्रसन्न. ॥

श्रीगणपत्युत्सव बाल-मित्र-संघ
पुस्तकमाला.

# सरस्वती कुमार कविता.

(भाग १ ला.)

प्रकाशक,
...रिश्वर नानल
...र [ठाणें]

REFBK-0002138
REFBK-0002138

सन १९२२ प्रती १०००

किंमत ३॥ आणे.

का.प. २३२
ठाणे ग्रंथालयाकडे
२१३८
REFBK-0002138
REFBK-0002138

॥ श्री ॥

# अर्पण-पत्रिका.

वन्दे वन्दारुमन्दारम् ।
इन्दुभूषणनन्दनम् ॥
आमन्दानन्द सन्दोह बन्धुरम् ।
सिन्धुराननम् ॥१॥
कृतोयं चार्पितो ग्रन्थः ।
प्रेम्णा भक्त्याच सादरम् ॥
मुहूर्तपादपद्मस्य ।
वार्णीपुत्रेण केसरे ॥२॥

…रस्वती कुमार.

# प्रस्तावना.

केसरीचे विद्वान् संपादक श्री. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्. एल्. बी. यांच्या हस्तें या पुस्तकाचे विक्रीपैकीं नफ्याची सर्व रकम महाराष्ट्रानभिषिक्त नृप कै. लोकमान्य टिळक यांच्या वाढ दिवशीं गोरगरीबांस द्यावयाची आहे. यास्तव माझे मित्र व बालकवि श्री. सरस्वती कुमार यांची निष्काम व स्वतंत्र वाङ्मयसेवा, सह्दयांशलाभ, अन्य प्रचोदन इत्यादि गोष्टीबद्दल प्रत्येक अभिमानी महाराष्ट्रीयानें हें पुस्तक आपल्या संग्रहीं ठेविलें पाहिजे. काव्याचें गुणदोषविवेचन करण्याचें हें स्थळ नव्हें.

बदलापुर. लक्ष्मण बळवंत ओक.
२१-१२-२१ विद्यार्थी टिळकमहाविद्यालय पुणें.

॥ श्रीगजानन प्रसन्न. ॥



# १ पुष्पार्पण.

श्री विद्यानाथा नमण्या संघाचे बालमित्र ते गेले ॥
तेव्हां सर्वांमिळुनी सुमनाला ' बालमित्र ' या नेलें ॥१॥
प्रेमजलें न्हाणीलें आदरतैलास लवुनी भक्ती ॥
गंधा चर्चुनि अंगा चरण सरोजींच वाहिलें हातीं ॥२॥
फार नको आह्मांसी बालांसी प्रेमदृष्टि ती टाका ॥
क्षणभर, विपलीं, चपला, सरला, वक्रा; नका वरूं नाका ' ॥३॥
करुणापूर्णा वाणी, मोहीं मन त्याच ईशरायाचें ॥
आलिंगुनि थोपटिलें, दर्शन विसरूं कधीं न पायाचें ॥४॥
करुणाघन विभु वदला, ' खाऊ तुह्मांस पाहिजे हो ना ? '
' खाऊ, खाऊ, खाऊ ' वदुनी मोदेंच हालवी माना ॥५॥
' ज्ञानमधू बालाली ! मिळवाया बुद्धिचंचु ही योजा ॥
पावित्र्यें या मेणें परउपकाराच पोवळ्या बाजा ' ॥ ६ ॥

## २ उन्मार्गायन.

[ ही कविता प्रख्यात आंग्लकवि लाँगफेलो यांच्या
'एक्सेल्शर' नामक राष्ट्रीय कवितेचा
आधार घेऊन लिहिली आहे. ]

गेला अस्तागिरीस सूर्य, तम ये, कृष्णा निशा दाटली ।
गारा वर्षति, वीज नृत्य करिते: मूर्ती दिठीं ठाकली ॥
हस्ती धीर युवा निशाण धरुनी निश्चितया वावरी ।
'उन्मार्गायन' शब्द हाच झळके त्याच्या निशाणावरी ॥१॥
धीश्रीसौख्यप्रतापयुक्तवदनीं अत्यंत तेजी वसे ।
त्याचें सुंदर नेत्रयुग्म चमके तारा नभीं जो असे ॥
पंचास्यासम धीर गंभिर रवें तो बोलता जाहला ।
'उन्मार्गायन;' अंतराळ भरुनी तो शब्द कीं राहिला ॥२॥
जातां धीर युवा महीरुहवरी लक्षावया थांबला ।
ये मंद ध्वनि, देश सुंदराचि धूमें पांडरें झांकला ॥
शैलाग्रें दिसती हिमावृत्त, भुतें हैमा धुनीमेखला ।
'उन्मार्गायन' वर्ण उक्त वदनें धैर्यें पुढें चालला ॥३॥
भेटे वृद्ध तयास मार्गि, वदला 'जाऊं नको रे! मुला' ।
वाटे कीं प्रहरास कृष्ण तम हा, वारा पुनः लागला ॥
ओढें वाहति तूर्ण, जीवन बहू- जाण्या पुढें तो निघे ।
'उन्मार्गायन' हा ध्वनि ग्रहसमें त्याच्या मुखांतून ये' ॥४॥
हाही भाग चढून जात असतां स्त्रीमाउली भेटली ।

‘ बाळा ! पूर्ण तुझा प्रवास कर रे !’ प्रेमें तया बोलली ॥
अश्रूपूर्ण तदाच नेत्र भवले तो जाहला चालता ॥
‘ उन्मार्गायन ’ उच्चतार धिर वाचा अल्पदुःखान्विता ॥५॥
जातां शेतकरी तयास वदला, ‘ रे ! कष्ट कां हे उगा ।
वल्लींचे घनदाट कुंज, विटपी मोठे व कांटेरि गा ! ॥
चक्री, व्याघ्र, मृगेंद्र हिंसक पहा, तूं एक अस्ता रवी ।
‘ उन्मार्गायन ’ शब्द निम्न उठला शैलांतुनी, भी न वी ॥६॥
दीर्घोद्योग अजस्र रात्रि समयीं, संपे तमिस्रा अतां ।
विश्वाला सुखें उषा सुरमणी नादावुनी टाकतां ॥
तेव्हां तुष्ट करा सुरा द्विजकुलें गाती अती हर्षुनी ।
‘ उन्मार्गायन ’ हा प्रतिध्वनि उठे तेव्हां विहायांतुनी ॥७॥
कालानें क्षितिजावरी ग्रहपती येई करें तोषवी ।
मर्त्यश्रेष्ठ युवावरी सहज ते-तें कार्य वर्णी कवी ॥
दीप्तीयुक्त वसुंधरा अखिल हो दृष्टीस तेजोमय ।
‘ उन्मार्गायन ’ शब्द एक दिसला, शून्यांत झाला लय ॥८॥
आपद्‌वृष्टि, ऋजामृगेंद्र, परकीं-विघ्नत्ववल्ल्याालय ।
अज्ञानक्षणदा सरो सकल हें, हो ज्ञानसूर्योदय ॥
आर्यावर्ततरूणवर्ग करुनी सौख्याचलीं त्या वसा ।
‘ उन्मार्गायन ’ मंत्रमूढ नयना तो कोण केव्हां कसा ? ॥९॥

## ३ रात्र ( ३१-७-२१ )

नाहीं भूतचि नेत्र हाय ! अमुचे ते अंध देखा हिला ।
नाहीं कां फुटलेचि कर्ण अमुचे ऐकावयातें जिला ॥
नाहीं कां गळलेचि पाय अमुचे, ते हस्तही सर्वही ।
कैसें तें जगलें तनू हृदयही ? मोठा डसे हा अही ॥१॥
चंद्रातें जणुं पाहुनी करविलें पीयूषपाना मया ।
त्याचा हा परिणाम घोर मजला लागेच सोसावया ॥
कर्णांनीं जणु कुंडलें मिळविलीं, त्यांना न कां याचलें ।
वज्राचें जणुं चित्त हें बनविलें; त्याला न कां जाळलें ? ॥२॥
पेटे सूर्य दिनीं गळून पडलें हें कृष्ण कीं कज्जल ।
दुःखाचें धन हे भरून जमले वर्षावयातें जल ॥
किंवा दुष्कृत कृष्ण काय फिरते हें आमचें अंबरीं ।
काळाची घन सावली पडत ही, ने लोकमान्यां खरी ॥३॥
नाहीं सूर्य दिनीं प्रकाशत नभीं, भास्वान् परी दीन हो ।
नाहीं चंद्रहि वर्षला मधु सुधा, तें गुप्त विज्ञात नो ॥
नाहीं एकहि तारका लुकलुके, गेलें तयांचें स्मित ।
लोपे सर्वहि सौख्य, दुःख सगळें येथें वसे निश्चित ॥४॥
घ्याया युक्त निशाभिधान मुळिं ना, जिव्हा पडे ही लुली ।
डोळेही मिटले कसे शतशतः, तेव्हां न ती जाणली ॥
कर्णीं ऐकुनि तप्त तेल गमतें वाटे भिने मध्हृदीं ।
ज्वालासें गरल प्रसह्य; कवणा ही सौख्य देई तमी ॥५॥
दुःस्वप्नें पडलीं अनंत मजला, भंडावुनी सोडलें ।
व्हावें जागृत धावरोनि शतधा, तें सौख्यही मोडलें ॥
निद्रेचें; मग सर्व यत्नहि मया केले परी झोंप ने ।
रात्री सजुनि ही उषा मग कदा येईल हें वाटणें ॥६॥

हा ! हा !! हा !!! परि मावळे हतमहाराष्ट्रार्यमा हो चिर ।
काळानें धरलें परोक्ष तिलकां, विंध्याचलें मीहिर ॥
चंद्रातें मज वाटतें ग्रहण खग्रासेंच कीं लागलें ।
आतां मानव गोष्ट काय वदुं मी, कां ? देवही भागले ॥७॥

आटे काय दयाघना ! तव निधी, ऐसें कसें रे घडे ।
ज्यातें सागर अल्पही, मग भरे तो काय ना ते घडे ॥
नेसी जीव कृतांत ! देवहि, नृपां, त्या लोकमान्यां तसें ।
मातेच्या परि संकटास हनतां नाहींच आलें कसें ? ॥८॥

हृद्रोगा नच वारिलें सुरभिषग्वर्यें; पहा दैव हें ।
मातेचें सुखवस्त्र आज हरलें, कृष्णा कसें साहवे ॥
बालानें धरिलें पुरा, तुज कसा भू ! सोडवे बाल हा ।
ह्याचा पादहि साहवे न तुजला; कैसा पहा न्याय हा ॥९॥

नाहीं मारुति ! ठेवलास तरणी व्योमीं, जया भाक्षिलें ।
गेले अर्जुन ! हस्तलाघव कुठें आतां तुझें रे भलें ॥
नाहीं माधव ! पोचली अजुनिही किंकाळि ही आमुची ।
नष्टाया अध आवतार सुजनां मारावयाची रुची ॥१०॥

गेले सोडुनि लोकमान्य अधुना दुःखार्णवी लोटुनी ।
तेणें ते यमदूत काय शकले त्यांना हराया गणीं ॥
हाही एकचि आवतार, सरलें जें कार्य देवें मत ।
दुःखागारचि सोडुनी गत सुखें भोगावया संतत ॥११॥

आतां प्रार्थित लोकमान्य ! तुमचें कर्णीं असे येत कीं ।
' देवो तो करुणेश शक्ति इतुकी ; ' मी होय या याचकीं ।

ते दूतोत्तम हिंद देशिय जनीं स्वर्गांतही होतिल ॥
विष्णू नष्ट तदां स्वदेशविपदा, सौख्यीं तदां तो किल ॥१२॥

## ४ ठाणें.

महाराष्ट्रीं भाग्यायुत नगर आहे प्रथमतः ।
पुरा आला श्रीछत्रपति शिवराया मग इतः ॥
स्वराज्या स्थापाया सबल निघतां हो जय सदा ।
समस्ताशाजेता नखर हरी देश विपदा ॥१॥
इथें आधीं लोहायन भरतखंडांत पहिला ।
कथामुक्तामालीं ग्रथित मणि तेजस्वि वाहिला ॥
असें पूर्वीं होतें विभव अजुनी वर्धनियही ।
सुभाग्यादित्याचा उदयशिखरीं हो उदयही ॥२॥
'महाराष्ट्र ग्रंथालय' भुवनविख्यात पहिलें ।
असें तेंही येथें सुमन फुललें अन्य अनिलें ॥
कुमारींची शाला सुसमयिंच आस्थापित पलीं ।
दुजी नूत्ना तारा निगमगगनीं ती चमकली ॥३॥

## ५ लंबोदर.

एका दिनींच गजराजचि येत धामा ।
केला प्रसाद मधुसा बहु भक्तकामा ॥
अर्पावया सुमनसें हृदयीं स्मरोनी ।
तो एक मोदक तुं कोट असें मिळोनी ॥१॥
बोले असत्य, अपशब्द; अधर्म कृत्य ।

केलेंच पाप सगळें वनगाननृत्य ॥
दुष्कर्म सर्व, नच पुण्य, सुटे स्वराशा ।
होई तदां उपरती स्तवितो गणेशा ॥२॥
प्रेमाप्रसाद सगळा ग्रहला प्रमोदें ।
केली कृपा सकल भक्तजनीं न मोदें ॥
पापा दयानद हरी, स्थल देत कोठें ? ।
लंबोदरी ! उदर काय अथैव मोठें ? ॥३॥

## ६ दोन अश्रू.

### [ अश्रू पहिला. ]

जेव्हां हारपला हिराच अमुचा तो काल नाहीं कदां ।
ध्यानांतून गमेल, नाक वरिला सोडून दुःखास्पदा ॥
गेला नश्वरविश्वपार अधुना ईशालयीं जावया ।
यानें साहयिलीं असह्य असलीं दुःखेंच सांगावया ॥१॥
यावच्चंद्रदिवाकरौ तिलककीर्तीची ध्वजा राहिल ।
त्यांच्या निर्मल कीर्तिनें हरिदभूमाता अशी होइल ॥
कीर्तिपुष्पसुवास हा दरवळोनी एथ राहील हो ।
नामोच्चार अशींच संतत वरी खालीं हृदें ही करो ॥२॥
देवांच्या सम त्या पुजोनिच करूं त्यांच्या सदा चिंतना ।
त्यांचा तो जप-आणि-आणि मम ये हा कंठ दाटून ना ॥
प्रेमा, दुःखचि, भक्ति तीनहि उमाळ्यांनीं भरें हृद् मम ।
झाली कुंठित ही मती, न चलती हे हस्त, होय भ्रम ॥३॥
आहे पामर मी, अशक्य करणें त्याची स्तुती हो मला ।

कैसे ते गुण वर्णवूं ? शिशुकरें चंद्रास घेणें कला ॥
हा हास्यास्पद यत्न काय करणें, हें योग्य माते असे ।
नाहीं हो, नच राहवे, बडबडे, जाणाल चित्ता कसे ॥४॥
नाहीं मी जन रामदास, न तुकोबा, वा न मोरेश्वर ।
कोठें व्यास, कुठेंच मी ! नच मला ती योग्यता, अंतर ॥
आहे फार अपार, कोठ सविता खद्योत कोठें असे ।
अंती हें ' जय लोकमान्य ' इतुकें विज्ञापिलें म्यां पिसें ॥५॥

## [ अश्रू दुसरा. ]

संपोनी दिन भास्करास्त भवता संध्या कदा हो तमी ।
इंदूचें रविचें कसें ग्रहण तें, कोठें, कदा; काळही ॥
येई तो कपिलासुयोग कथितां सप्ताहिं एक्या दिनीं ।
जाई तो नगराज सागरतळीं, सिंधूपदीं मेदिनी ॥ ६॥
पृथ्वी होउनि शीत, शीतहि कदा बर्फाहुनी होइल ।
होई सूर्य कदाच कृष्ण ? अधुना नाना कथा मी पल ॥
सांगा व्यर्थ न अज्ञ एक दवडी, कां ज्योतिषातें पुसा ।
' केव्हां जातिल लोकमान्य अमुचे ' हा हा ! न कोणी कसा ॥७॥
बाळाचा जननी वियोग कळला नाहीं तुला ही अहा ।
वाटे ना श्रम युक्त आज मजला केले ऋषीनें महा ॥
अश्रूनी भरते समुद्र सगळे ' हा ! बाल कोठें असे ! ।
नाहींना कळलें भविष्य तुजला कुंभोद्भवा ! रे कसें ? ॥८॥
होते रे यमराज ! लक्ष दुसरे मृत्यूस आलक्षित ।
मोठे ते नरवीर सर्व असतां बालास या रक्षित ॥

कैसें नेववलें तुला; तुजकळे तें त्यांतलें इंगित ।
लोकेशा ! मज जन्म काय दिधला भोगावया दुष्कृत ॥९॥
अंधःकार जिथें तिथें पसरला, कोठें न कांहीं दिसे ।
दुःखानें पन आज कीं बरळतें होवोनि वेडे पिसें ॥
नाहीं औषध यास, एक दिसतें—बाळाविना ने वदा ।
गोला हो 'जय लोकमान्य' अधुना कानीं कपाळीं सदा ॥१०॥

---

## ७ दगडाची महत्वाकांक्षा.

[ फिरत असता एक रक्तवर्णी शिला दृष्टोत्पत्तीस आली- मनांत शंका येऊन तीस प्रश्न केले. मिळालेलें अनपेक्षित उत्तर ऐकून 'महाराष्ट्रांतील दगडसही महत्वाकांक्षा' असते हें कळून मी थक्क झालों ]

" श्रीमद्बालिघटाश्मसंचयवियोगें ऐत, भी मारण ।
दर्शाया नरपुंगवास दुरिता झालास कीं कारण ॥
स्फूर्ती तूंच दिलीस कायचि महाकाव्यास लेखावया ।
आश्चर्यें मति गुंग तू क्षम जगत्पापास वारावया ॥१॥
" राजाज्ञा धरुनी शिरीं कृतमहाराष्ट्रस्वराज्या जया ।
गेला सिंहगडास तत्क्षणिं भया सोडोन जिंकावया ॥
ऐसा तो समरांगणीं नरहरी, अश्वार्द्र ऐशा तटा ।
तानाज्यत्यय दुःखमूढ दुरुनी ताच्चिंतना एकटा ॥२॥

" बाजी पार्थिव बंधु दुर्ग अरिचा घ्याया शिरच्छेदना ।
आज्ञा दे तंव तेज सह्य न, शिला गेल्या उडोनी जना ॥
वार्ता सौख्यद, उत्सवार्हचि महाराष्ट्रास तूं दूतसा ।
हेतू पूर्वजशौर्य गोष्ट कथणें; कऽव्यन्य सांगे कसा ? " ॥३॥
" नाहीं मी कुठला न कुंभगडचा, होतो क्षिती मी पुरा ।
काळानें वर येत काक, बक ते शोभीत माझ्या शिरा ॥
टाकींचे घण सोसुनी मग पहा मूर्तीच मी होइन ।
तेव्हां देव, अथैव लोक मजला प्रेमें कवे ! वंदन " ॥४॥
आर्यावर्त-जनांस बोध दिधला सुग्राह्य तेणें अहा ।
जे का सद्गुण, वीर्य, सत्वहि महत्वेच्छा त्यजाया पहा ॥
व्हाव्या वंद्य शिला जनां, जन नराधप्रैष्य होती अतां ।
घोराती विधि दुर्विपाक दुसरा याहून तो कोणता ? ॥५॥

## ८ अन्योक्तिसमुच्चय.

### [ निशाण ]

मार्गी उंच उभाच, आकृति महा ती आदरें मानिती ।
नाहीं पाउस, वायु, ऊन, गणसी अन्हीं श्रमातें किती ॥
साहोनी सगळें निशीं शुचिहि, रूपग्राह तूंते कळे ।
कर्तव्यीं रत तूं ह्मणून तुजला सन्मान वाटे मिळे ॥१॥
मार्गी राहुनि सर्वदा उपकृती; ती कंधरा वाकवी ।
दावोनी हिरवा सुवर्ण-शुचिभृत् तोरा किती दाखवी ॥
भक्भक्भक्; मग लाल क्रुद्ध, लवली ना मान तो थांबला ।
' नाहीं ही दुनिया भल्यास्तव खरा तूं ! न्याय हा दावला ॥२॥

[ २ कुलूप ]

आकारें लघु रंग वर्ण्य नसतो, भोकें खिळे त्यांतही ।
होसीरे कुलुपा ! च पात्र जगतीं रक्षावया वित्तही ॥
नाहीं शृंखलदंड, ना नरहि ! चोरांचें हराया भय ।
उत्कर्षा गुण एक उत्तम असो आहे जगाचा नय ॥१॥

[ ३ दौत लेखणी. ]

जोडी होय अपूर्व एक जगतीं, कोठें न ईतें सरी
सारें विश्वलयास खासाचि गमे नष्टाल ईतें जरी ॥
देवानींहि जयास मान धरणीं; वंद्या न कांती असे
' आहे स्त्री अबला ' च याच वदती तें सत्य कोठें नसे ॥४॥

[ ४ लेखणी. ]

रानीं कीटक तुच्छ चावित तुला होते पुरा लेखणी ! ।
जेव्हां येउनि तूं स्थिता नरकरी आली प्रभा गे ! म्हणी ॥
आतां खूष करावयास तुजला राजेशही वांकती ।
' स्थानत्वें गुण लाभतो ' असत कीं ऐशी जगाची रिती ॥५॥

[ ५ शुक. ]

केला खून अथैव रक्त दिसतें ती चंचु वक्रा शुका ! ।
चित्तानें उलटा, कठोर वदसी ते बोल हारे ! फुका ॥
नाहीं नृत्य, न पिच्छ बर्हसमतें, रे एक नाहीं गुण ।
आहे हें जग भारलें मज गमें वाग्जाल हें कारण ॥५॥

[ ६ वृक्ष ]

भूमीनें तुज पोशिलें महिरुहा ! स्थाना, रसा देउनी ।
मेघांनीं जळ पाजिलें तुज, करें सूर्यें बळा देउनी ॥
वृक्षा ! तूं अससी कृतज्ञ पितरा वेंचा परार्थां सदा ।
' माती खाण तशी ' असें पटविशी हें सत्य मातें अतां ॥६॥

[ ७ मयूर. ]

आहा ! सुंदर रूप-भान हिरवी-छे वेड लावी मना ।
वर्णां वर्णहि अल्प तांडव सदा लक्षावया कामना ॥
सूज्ञत्वें परमेश्वरें स्वरपदें मूर्ता मनोज्ञें कसें ? ।
मित्रा ! दुःख उगा कशास करिसी, अव्यंग कांहीं जसें ॥७

[ ८ कोकिळ. ]

नाहीं सुंदर तू मयूर शुक वा, तूं कृष्ण काकासम ।
शक्ती अल्प, शरीर सान, विटपीं तू स्तेन त्वद्विश्रम ॥
पीयूषासम गान कर्णचषकीं जेव्हां परी ओतिसी ।
तेव्हां तू पिक, यास्तव व्रत तुझें ते मर्त्य दे आशिसी ॥८॥

[ ९ कोळी. ]

आहे क्षुद्र शरीर, शिक्षक नसे, कांहीं नसे यंत्रही ।
धागे लांब अतीव सूक्ष्म, करणी शक्या न जी मानवी ॥
चापल्यें घरटींच सुंदर अहा ! जें ईश्वरा चाहतें ।
बुद्धी, कृत्य अगाध मर्कटक ! बा कोठें कसें राहतें ॥१०॥
दाही बाजूस नेत्र, सुंदर दिसे तें गेह आहा ! किती ।
कारागारहि थक्क कार्य बघतां- येतांच नेत्रांप्रती ॥

विध्वंसी नर नीच हेतु कळतां; हा वेष साजे बरा ।
' नेत्रातें दिसतें तसें नच असे ' हा न्याय आहे खरा ॥११॥
मित्रा ! विश्व दिसे तुला, किटकही दुःखास हो पारखे ।
मानी तूं वसुधा कुटुंब गृह तें सर्वांसही सारखें ॥
सत्कारा तव सेवितां [illegible]नही, सोडी न गेहा कदां ।
वाटे तूं मज मात्र तत्पुरुष तंतूवाय ! विश्वीं सदा ॥१२॥

[ १० आगगाडी. ]

मोठें रूपहि, वेग अग्निरथ ! अल्पान्नें, पदें ने पुरा ।
वर्णूं शक्ति तुझी अचाट किति मी ही हालतेही धरा ॥
स्वेच्छेनें तुज नेत–अल्प नच-लत्ताघात नित्यं बसे ।
' दास्यत्वें बलवान् हि पंगु बनतो ' हा न्याय येथें दिसे ॥१३॥

[ ११ छत्री. ]

वृष्टीची नच भी, अहर्निश धृता सिद्धा सदा रक्षणा ।
नाहीं शीत, न उन्ह, कृष्ण पडली, हा होग मोठेपणा ॥
होशी सानहि वाढसी, जन-सुखा नानापरी मोडिली ।
' वंद्या स्त्रीहि परोपकार सुरता, देवें शिरीं जोडिली ॥१४॥

[ १२ घड्याळ. ]

नाहीं आत्मविचार, संतत करी दुःसाध्यही जागृती ।
आहे काळ अनंत मानव वदे, हें एक मापाप्रती ॥
जाणी एक परोपकार; हृदयीं हस्तीं, शिरीं ठेविती ।
आहे मोल गुणा; न लिंग वयही, रूपा कधीं मानिती ॥१५॥

[ १३ वात. ]

होतो वाचित काव्य सुंदर, परी संध्या तदा आगली ।
वाचाया गृहिं पेटवी समयिसी जोडी जळूं लागली ॥
झालों स्तंभित पाहुनी तिज तदा, येई श्रुतीसी ध्वनी ।
' यज्ञीं अर्पवि सौख्य सर्व इतरा ' बिंबो सदा हें मनीं ॥१६॥

[ १४ खद्योत. ]

मार्गीं दीपकगेह, रक्षक निशीं वृक्षा, उडू मूस ये ।
सूर्याचा अवतार, विष्णुरथ तत्पादें जणूं तेज ये ॥
आहे भाग्य अपार, सद्गुणनिधी ! हें दुःख कां सोशिसी ।
' वेची जन्म परार्थ ' दात कीं महंता ईश्वरें आशिसी ॥१७॥

[ १५ खडू. ]

गंधाढ्या ! झिजसी परार्थ, गतहि त्वपुण्य-प्रभू भाल दे ।
नाहीं वास खडूस सत्य; झिजतो तोही जना ज्ञान दे ॥
नाहीं गर्व तया सुगंध तुजसा, कां ज्ञान तें श्रेष्ठ न ?
कैसें त्या करितीं, रसज्ञ नसती, ऐसेंच सांगे मन ॥१९॥

[ १६ हत्ती. ]

बाह्यें कृष्ण, मलीन, विद्रुप; अहा ! मुक्ताफळें अंतरीं ।
वर्णीं श्वेत, सुगंध तो विखरला देवेंद्राचिचा हरी ॥
येती ते मकरंदपान करिती वाहून भुंगे रज ।
' बाह्यें सुंदर पद्म कृष्ण हृदयीं ' जाणून नाशी गज ॥१९॥

[ १७ आरसा. ]

केलें स्नान पुरें, रवा उगाळिला, भाळीं टिळा लाविला ।
होई वक्र, तदा सुरेख करितां झाला जरा वाकुला ॥
केला सास्मित, दुःखी, होय तसला माझ्या मुखाचा ठसा ।
'जैसें कृत्य तसाच भोग' मजला दावी धडा आरसा ॥२०॥

[ १८ मार्जार. ]

वर्णीं निर्मल शुभ्र केश असती पुष्पासमें कोमल ।
डोळे चंचल, तीक्ष्ण, शब्द मधुसा, तें नित्यही निस्तुल ॥
तीक्ष्ण घ्राणहि, साध्य गुप्त गतिही; भक्ष्याखु हें रे कसें ।
'बाह्यें श्वेत तूं कृष्णकुट्ट हृदयीं' हा न्याय नीचीं वसे ॥२१॥
यत्नातें करिसी सदा, नच धरी तूं आपदांचें भय ।
साहे कृष्ण न कीं म्हणून करिसी त्या मूषकांचा लय ॥
सत्कीर्तीगुणलालसा तुज असे त्वां दुग्ध तें आवडे ।
'आदर्श प्रभुनें जणूं करविला लोकां' न कोठें नडे ॥२२॥

[ १९ फुलपाखरूं. ]

खावा तो मकरंद कालसमयीं, अन्हीं द्विनांतीं मुदें ।
शय्या कोमल पुष्प, सुंदर तनू हें विश्वही मोकळें ॥
वर्षाकाल करी बिघाड सगळा हो नष्ट हें वैभव ।
दैवें चक्र कसें; वसो निजमनीं सांगे न मी हें नव ॥२३॥

# ९ असें कां ?

[ सृष्टीसौंदर्य रसिकांच्या हृदयांस केव्हांही आकर्षित करितें कारण; त्यामुळेंच ईश्वरकृतीपासून उत्पन्न होणाऱ्या अनुपम सौख्याचा आस्वाद घेतां येतो ]

[ १ आम्रफळ. ]

भूमीं आम्रबिजें किती रुजुनियां रोपें बहू वाढलीं ।
झाले भव्य तरु, स्मशान न तिथें, उद्यानभूमी भली ॥
झाडें पालवती, फुलें विखरती गंधा, फलें वांकली ।
छाया शीत नरा, अलींस कुसुमें,नानाजनीं चाखली ॥१॥
साटें तें खुसखूशितें, मधुरसें; पाणी मुखा येतसे ।
किंवा काचघटीं कसें विलसतें मोराम्र नामें नसे ॥
नाना गोड पदार्थ हे 'ममकृती' ते पाहती वानिती ।
हेतू मूळ तयां परेश न दिसे, धिक्कार मूढांप्रती ॥२॥

[ २ तारका. ]

चाले नृत्य सदा मधूर विलसे तें हास्यही आननीं ।
आहे निस्तुल चालणें, ठुमकणें, तें पाहणें; ज्या मनीं ॥
मावेना मम हर्ष देखुनि पलीं; एक्याक्षणीं दर्शनें ।
झालों मी हसनिर्भर, प्रभु न मी अदृष्ट कां जनें ॥३॥

[ ३ चंद्रमा. ]

येतां सोम अहा सुपूर्ण उदया तो शारदा पूर्णिमीं ।
तेजें लोभवि लोचनें, दिसतसे कोठें विश्वीं सरी ॥
पीयूषांशुमनोहरीं न किरणीं ज्या सौख्य कांहीं नसे ।
जेव्हां तो करहेमवृष्टि; हृदयीं दुःखांश ना तो वसे ॥४॥
तो खस्वस्तिकयात राजतकरें विश्वास या द्योतवी ।
तेव्हां शांत, मनोहरा, प्रमददा, आहा ! श्रमघ्ना, नवी ॥
येई सृष्टिसि नूत्न वैभव पुरें, सौंदर्यसंवर्धिका ।
यावेळीं नर मात्र कृष्णभवनीं घेतात निद्रा फुका ॥५॥
जाई अस्तघरा प्रभातसमयीं, तेजें जरी त्याजिला ।
कांती लक्षुनि सुंदरा, दिपविते नेत्रां, न सौख्या तुला ॥
आहे दृश्य, न वर्ण्य अल्प, बघतां नृत्यार्थ स्फूर्ती भवे ।
यावेळीं न कळे कसें जनगणां त्या मंचकीं घोरवें ॥६॥
नौकेंतून विहार कोण करिती, पुष्पें जलीं वाहती ।
वाटे कीं मग चंद्रहार तुजला, रत्नें पहा भोंवतीं ॥
नाना सुंदर कल्पना सुखवितीं चित्तास चित्तंगम ।
ऐशा या समयीं परी खलनरा ! संसारकार्यीं रम ॥७॥
आधीं लालचि, पीत नंतुर पुढें हो शुभ्र तेजोमय ।
होई कृष्ण पलें पलें, मग तमीं संरक्त वन्हीसम ॥
कोकानादरकारणें, कळतसे तें मूल्य आतां खरें ।
स्नानें तीं करितीं फराळ-विधु तो अदृष्ट तस्मात् नरें ॥८॥

———

[ ४ सविता. ]

कृष्णा ती रजनीं हरून गगनीं तेजें भरी मेदिनीं ।
दृष्टीचे पथ मोकळोनी पुढती सौंदर्य याची खनी ॥
ठेवी तो भुवनीं, च शैत्यशयनयनीं मंदोष्णता आणुनी ।
ऐसा तो तरणीं झणी जनमनीं यावा सदा तो कनी ॥९॥
घेई तो पय आविळ प्रशमना तृष्णा तिचें जी तया ।
देई तो जलवृष्टिरूप करूनी अच्छोदका त्या पया ॥
बीजें हीं रुजतीच, वृक्ष बनती, धान्यें फळें लोंबतीं ।
त्यातें भक्षुनी लोक जीवन पिती सौख्यार्णवीं नांदती ॥१०॥
विश्वामित्रगुणांस मत्सम कवी गाई कसा गायनीं ।
होई हें वनरोदनासम जरी कोणी न आणी मनी ॥

[ ५ पर्वत. ]

वाटे जाळित सूर्य चंडकिरणें ही कोमलांगी धरा ।
आली ईशमना दया ह्मणुन कीं दे छत्र छाया करा ॥
तो हा पल्लव वाटतो नृनयनां जो ताम्रवर्णे दिसे ।
भासे पावक कीं असे पसरिला, हा दाह त्याचा असे ॥११॥
किंवा भास्करताप अल्पगमुनी क्षुद्रत्व वाटे तिला ।
येई हास्य, कपोल काय ह्मणुनी हा शोभतो रंगला ॥
किंवा भास्कर भानुवर्ष भवता तत्ताम्रवर्णामुळें ।
फाल्गूनांतिल पंचमीस अचला ही रक्तवर्णी वळे ॥१२॥
ती चेतोहर, नेत्ररम्य सकलां वासंत शोभा असे ।
कर्णा कोमल पक्षिकूजित; मनीं मोदा न जागा वसे ॥

कांहीं काल असा वसंत दिसतो वर्षर्तु ये मागुती ।
येतो वृष्टि करीत शीत, सुखवी चित्तास नेत्रांप्रती ॥१३॥
गानें मूढ कुरंगसंघ विहगांच्या, बद्ध जालीं हत ! ॥
व्याधाच्याच; किरात निर्घृण असे ते सज्ज तेथें स्थित ॥
अत्यानंदकगान सृष्टिरमणीचें तें, मृगांची स्थिती ।
व्याधांचें कठिणत्व मेघ बघती, अश्रूंस कीं ढाळती ॥१४॥
ईशाला जणु आळवीत बसले होते सदा ते खग ।
तोयातें मिळण्या 'चला' कळविती पालाशवर्णी नग ॥
रंगानें जणुं कृष्ण अंबर असे हें कृष्ण कीं जाहलें ।
कोणी राक्षस धूत अच्छ कारितो अदृश्य मोठा जलें ॥१५॥
मेघांची जणुं पुष्पमाळ अचला कंठीं असे घातली ।
सृष्टीनें, खुलली परस्परछवी; सौदामिनी पातली ॥
चंद्रज्योतिच, इंद्रचाप दिसतीं तीं तोरणें हो मला ।
झालें गर्जित हा विवाह सगळा आतां असें जाहला ॥१६॥
भूमीं क्षुद्र बिजें अनंत रुजती, रोपें बहु वाढती ।
तेणें सुंदर शोभते सुविमला पालाशवर्णी क्षिती ॥
आतां वाहाति सर्व देशहृदयीं अच्छोदकाचे झरे ।
वर्षोपांत असे अहा! करविलें हें खजुराचें खरें ॥१७॥
ऐशा त्या अचलावरी विहरती धेनूमृगांचे गण ।
गोवत्सें मृगबालकें मिसळतीं, वाटे तया हा सण ॥
क्रीडा लक्षुनि मोद फार मनसा वाटे तयाचा किती ।
सौंदर्या अवलोकिणें जन मनीं हें भाग्य ना मानिती ॥१८॥
ओढे गान मधूर नृत्य करिती, अच्छोदकें ज्यांचिया ।

लाजे स्फटिक कांति; गान करिती या लोक हो याचि या ॥
प्राशोनी अमुच्या प्रसन्न सलिला तृष्णा जलाची हरा।
त्याते प्राशुनि पाहुनी नर मनानेत्राचिही हावरा ॥१९॥
वर्षानंतर ये शरत्समय तो प्रावा हिमाचा असे।
तेव्हां सूर्यकरीं दिसेच नयनां तो रुप्यभूभृत् असे ॥
मध्यान्हीं; परि संधिकाल असतां तो कांचनांगी गिरी।
लक्षाया धनलिप्सु यांस बहुधा ठेवीतसे तो हरी ॥२०॥
कोणी पर्वत चंड तुंड उघडी जें कुंड वन्हीमय।
जिव्हा दीर्घ करी नभाशन करा ती लाल तेजोमय ॥
जेव्हां तें नच सांपडे, वमतसे रक्षा, शिलेचा रस।
तेव्हां अंबर भाजतां रडतसे; शैलास येई हस ॥२१॥

## [ ६ सागर. ]

येतां भंगानि तुंग जात पुढतीं नष्टत्व ते पावती।
ज्या स्थानीं क्षणपूर्वि भंग अधुना तेथें दऱ्या नांदती ॥
वाटे ईश सदा जनांस नय हा दावीत, पाहों कधीं।
बोधें ज्या सुखदुःखवीचि उडती संसारकीलालधीं ॥२२॥
पारावारहि ईश्वरासम असे ज्या अंत आदी नसे।
रेणूहूनहि सान कारण नभीं बिंदुस्वरूपें वसे ॥
विश्वा प्राण समस्त तज्जल असे तन्नाम अन्वर्थक।
अंधानें नच देखिला; सनयना वाटे महा सार्थक ॥ २३ ॥
वेगें निर्भर वात, चक्रपवन प्राप्ताच अरण्या तया ॥
मेघश्यामलवर्ण कृष्ण करिता झाला सरस्वत्पया ॥

मराठी ग्रं... दा. क्र. २९३८

फेनें अर्जुन मेदिनीज बनले वाटेच कालानन ॥
ग्रासाया जणुं जंतु सर्व; करितां केलें असें सान न ॥ २४ ॥
मेघांनीं नभ झांकिलें, पवन तो वेगेंच वाहे सदा ।
अर्कास्तीं तम भूमि हीच करिता झाला निवासास्पदा ॥
गर्जे वर्षित मेघजाल, जल ती सौदामिनी वावरे ।
नीरोल्लोल समस्त फेन; बघतां धैर्यत्व हें बावरे ॥२५॥
कुंभीरांडजकूर्मशंकुगण ते भीतीमुळें धांवती ।
नौकेंतील समस्त दुःसह असा मृत्यू जलीं पावती ॥
होती यत्न निरर्थ; कोण सुटतो कालाननापासुनी ।
गेले लोक; गता तयासह असे त्याची स्मृती लोपुनी ॥२६॥
संध्याकाळ सुमंगला, सुखद ती, चेतोहरी सर्वदा ।
अब्धी लज्जित भूप काय करण्या काढी अतां संपदा ॥
सूर्या तूंच निवास योग्य दिसतीं, तेणें बहु शोभसी ।
सर्वांगावरि कांति येत तुजला लक्षा सुवर्णा कसी ॥२७॥
वाटे भास्कर आत्मरूप बघतो आदर्श हा घेउनी ।
सृष्टी क्षौमसुपीतवस्त्रवासिता झाली असे ये मनीं ॥
भेटाया प्रिय येत काय बहुधा उत्फुल्लवक्त्रा धरा ।
देखावा सुख दे अतीव सकलां ज्या नेत्र ऐशा बरा ॥२८॥
कोठें ताम्र तसाच पीत अथवा कोठें निळाही तसा ।
नाना रंग सुरंग, वर्ण्य वदना ना चिंत्य वा मानसा ॥
होई ती कड पीतः रक्त, हिरवी वर्णेंच तो रंगला ।
ऐसा मेघसमूह भूरि धरितो रूपांस सन्मंगला ॥२९॥
कोठें सिंह, मयूर सुंदर असें; नाना स्वरूपें किती ।

कोठें लष्कर युद्ध तें करितसें; यानीं सुरांची गती ॥
नाना सुंदर चित्रवृंद उदधीं बिंबे भ्रमें हें मन ।
पाहोनी, परि तुच्छ हाय! गमतो जो नीच भारी जन ॥३०॥
जेव्हां ये द्विजराज पूर्ण उदया शोभा किती दाटते ।
ज्योत्स्नानृत्यतरंग, अर्णवचि ने हें सत्य कीं वाटतें ॥
पुष्पें जात नभीं यदा उधळिलीं, गेली किती अर्णवीं ।
ऐशा या सुषमेस निस्तुल कसा वर्णी कवी वर्णवी ॥३१॥
आहे सागर एक, अन्य समयीं अन्य स्वरूपा वरी ।
जैसा ईश वरिष्ट दुष्टदमना नानावतारीं धरी ॥
कूपातें करितां तयास जन जो मोठ्या स्तवी व्यर्थ हा ।
देवाची करणी अगाध असतां, यांची स्थिती ही पहा ॥३२॥

................

## १० घंटेचा सवाल.

[ ठाण्यास पोर्च्युगीज चर्च आहे; त्यांतील घंटेचे दर पहाटेस नगरवासी जनांना उषेचें आगमन सुचवून व जागृत करून कर्तव्यकर्मास तत्पर होण्या-साठीं टोले देण्यांत येतात; त्यांवरून हा ' सवाल ' रचिला आहे. ]

प्रभातसमयीं लोळत असतां शय्येवर जागा ।
घंटा ठणूठणू करूं लागली कर्म करूं लागा ॥

ध्वनी निघाला लहरी वरती, खालीं भोंतालीं ।
चहूंकडे त्या सहज पसरिल्या, लक्ष तदा जाई ॥
ऐकत असतां तल्लिन झालों, एक दिव्य वाणी ।
ऐकूं आली, लक्ष लागलें ठण्ठण् तीं गाणीं ॥
' हिरा पाहिला महाराष्ट्राचा शिवनृपती आला ।
स्वराज्यसूर्योदया प्रथम कीं म्यांच येथ पहिला ॥
ठण्ठण्ठण्ठण् तोच चिमाजी शूर, वीर, दाणा ॥
दुस्मन अमुचा वंद्य अह्मांला त्यास कशा आणा ।
ठण्ठण्ठण्ठण् मींच दाविलें बाजीरावातें ॥
आला जेव्हां तह्रा अहा ! हर ! तिरीं करायातें ।
ठण्ठण्ठण्ठण् आला जेव्हा लोखंडी सरणी ॥
अग्निरथातें मींच पाहिलें प्रथमचि ती करणी ।
ठण्ठण्ठण्ठण् तिलक पाहिला उठवाया आला ॥
अन्य न दुसरा जगीं असा ' जय लोकमान्य बोला '
ठण्ठण्ठण्ठण् अजून नाना गोष्टी मी आतां ॥
पहात आहे भविष्यकाळीं पाहिन मी घडतां ।
येथें राहुनी उभें पाहिलें महाराष्ट्र-देशा ॥
शतकत्रय मी कसें वरियलें अन्य अन्य पेशा ।
रवी उगवला, शिरीहि चढला, अस्त हेंच सगळें ॥
राज्य स्थापिलें, वैभव चढलें, नष्ट कसें झालें ? ।
क्षणभंगुर हें राज्य असावें जैसा बुद्बुद ॥
भव्य राष्ट्र हें लयास गेलें; न्याय हाच सिद्ध ।
' विशाल विटपी समूळ पडती वारीनें ढळती ॥

लोहाळे ते विनम्र होती, कार्य परी करिती ' ।
शिवबासाठीं घंटा केली चिमणाजी साठीं ॥
बाजीसाठीं घंटा केली तिलकांच्यासाठीं ।
जागा झाला महाराष्ट्र हा पहिल्या नादानें ॥
वैभवाशिखरारूढ शोभला दुसऱ्या नादानें ।
झोंप लागली दुष्ट कशी त्या तिसऱ्या नादानें ॥
निशा संपली काय नसावी चवथ्या नादानें ।
सवाल ऐसे सहस्र वेळां तुम्हांसी केलें ॥
वैभव आलें, झालें, गेलें, काय कसें घडलें ? ।
कंठशोष मी किती करावा कसा कदा सांगा ॥
भगीरथाची येइल कैशी पवित्र ती गंगा ।
सरतिल केव्हां वनवासाचीं रामाचीं वर्षें ॥
पांडव येतिल गृहा कदा तें सांगा हो हर्षें ।
जेव्हां माझे सवाल तुमच्या कर्णीं जातील ॥
' भाग्यरवीचा उदय होय ' ही खूण मनांतील ।
जेव्हां येइल देतां उत्तर प्रश्नातें सत्य ॥
भाग्याचा तो दिन हो तुमचा, करा तदा नृत्य ।
विष्णू देवो, गोतम देवो, पैगंबर देवो ॥
ज्ञान तुम्हांला पुरुषत्वाचें सत्य प्रभू देवो '॥ १ ॥

## ११ ईशप्रार्थना.

बाल असो वृद्ध असो बुद्धी देई गणेश तो सकलां ।
लघु वाढे तज्ज्ञ नचि न्याय जसा तो नदीप्रवाहजला ॥१॥
मित्र असे बालांचा, बालांचें ज्ञान वाढण्यासाठीं ।
त्राता गणपति मजला साह्यवरो प्रत्यहीं बहू पाठीं ॥२॥
चाखावीं अमुची ही मीठ अणी भाकरी गरीबीची ।
विनती करतों सकलां, गोडधडें त्यजूनि नित्य नेमाची ॥३॥
जयजय मी गणदेवा ! कीर्ति तुझी गाउनी सुखी होवो ।
यष्टी आत्मकृपेची संकटतमिं मार्ग दर्शिका होवो ॥४॥
अजरामर मित्र असो, बाल नसा ज्ञानवृद्ध सकलासी ।
सोम जसा चंद्रमण्या; नम्र असे हीच अर्थना माझी ॥५॥

---

## १२ श्रीगणेशस्तोत्र.

धीपक्षें मनमत्स्या ग्रासाया सूर्यमंडळा बघतां ।
श्रीगजमुख वर्णाया मज वेड्या काय लाभ पापहता ॥१॥
परि जैशी शोभा ये चंद्रातें तारकाविना रजनीं ।
नच, हें रक्षुनि हृदयीं यत्न असे हा गणप्रभूभजनीं ॥२॥
मी काजवा ह्मणे गा सूर्यातें द्योतवीन विश्वाला ।

कीं लाजवा जवानें भृंगी इच्छी क्षणांत अश्वाला ॥३॥
तेव्हां गजानना ! हे कर मातें आपलें कृपापत्र ।
अमर प्राशुनि अमृता पर्णाचें टाकतील तें पात्र ॥४॥
व्यासपुरोत्तर-मुनि जें कथिती ग्रंथांत तेंच मी सांगे ।
गंगाभागिरथीसम, पागोळीसमचि मी परी भागे ॥५॥
ज्ञान नसे लवमात्रहि; नाहीं त्या कल्पना मला येत ।
बुद्धिहि मूढा मोठी, त्वत्स्तवकरणा असे परी होत ॥६॥
स्तवही येत नसे बा, अकरण तरि तेहि हो महत्पाप ।
ताराया या कालीं क्षम बाला एकलाचि तूं बाप ॥७॥
त्वत्पदयुगुलसरोजस्थितमस्तकबाल हा तुला बंदी ।
त्वत्पदकमलीं भक्ती, कर तत्सेवा अनुग्रहानंदी ॥८॥
विश्वीं या विद्येचा मान जसा हो सुधेस तो स्वर्गीं ।
सत्यचि ही अजरामर करिते सुजना ह्मणून तद्वर्गीं ॥९॥
विद्येशा वर्णाया मनुतनयीं कोण तो समर्थ असे ।
गरुड जरी उंच उडे आकाशीं मुळिं न अंत लागतसे ॥१०॥
'हा आह्मां वंद्य असे' ह्मणती ते देव सर्व एकमुखें ।
रानीं, गृहीं, गरीबा, श्रीमंता वरसि नित्य सत्य सुखें ॥११॥
तत्सद्विशालभालीं सप्रभ इंदू करीतसे वास ।
कीं जो भक्तजनांची पुरवीतो नुरवि एकही आस ॥१२॥
श्रीलंबोदरचरणीं मन्मनिं वाटे सदा नमावेसें ।
एके दिवशीं वाढे प्रेमचि वाटे सदा न मावेसें ॥१३॥
कोट्यावधि त्या विपली तन्मय मन हें न आपणा करवें ।
नमितां चट्टे भाला, गर्जित असतां दिशा जरी सुरवें ॥१४॥

बाह्यांगीं नमणें हें गौण असे परि समस्त तें करिती ।
अंतरिं काहिं असो परि बाह्या भुलणें समस्तजनरीती ॥१५॥
बुद्धी दे गणदेवा ! संकट मोठें पडे अतां मजला ।
वाटू प्रसाद' ह्मणती, 'सिध्यास्पद करि, करी प्रसार मला ॥१६॥
फसले परी परीक्षीं गणरायातें शिव्या अणी शाप ।
ध्वनिहि ज्यांचा करणें वाटे मजला असे महत्पाप ॥१७॥
दु:खप्रतोद बसतां सुखवस्त्राचाच त्याग जों होई ।
ईश्वर मग येइ मनीं, स्मरणें नंतर तया सुरू होई ॥१८॥
गृह जो ज्वलिताचि होई तेव्हां खणली विहीर तच्छमना ।
आहे आशा कांहीं स्मरता ईशास सिद्धि ती होण्या ॥१९॥
जरि नाहीं या जन्मीं विद्यानाथा स्मरावया भाग्य ॥
पुढच्या जन्मा करणें अल्प तयारी विचार हा श्लाघ्य ॥२०॥
हंता गजासुराचा, देवाधीदेव, नाथ विद्येचा ।
त्याच्या स्मरणें हरतीं सर्वहि विघ्नें, समुद्र प्रेमाचा ॥२१॥
आहे सुदयामूर्ती, सत्याचीही, तशीच ज्ञानाची ।
अवगत नाहीं त्या म्यां मूर्खें तिजला कशीच वानाची ॥२२॥
परि हो त्याला स्तवणें प्रथम जनांचें अवश्य कर्तव्य ।
वेड्यानें मूर्खानें त्याला स्तवणें, नको महाकाव्य ॥२३॥
दीन असो मूर्ख असो भक्ताची त्यास आस नी कोडें ।
दीनां करी सुखी तो मूर्खा ज्ञानी, पडे जनां कोडें ॥२४॥
विद्या ही विश्वाची प्राण जसा हो समस्त त्या जीवां ।
ह्मणुनी आत्मबलानें विद्यानाथो तुह्मींच तो गावा ॥२५॥

जैशी जलपानानें कार्या करतीं सतेज हो पानें ।
व्हाल तुह्मीं तैसेची सांगे गणदेवभक्तिरसपानें ॥२६॥
गणपतिदेवनुतीनें बहिरे होवोत आपले कान ।
अमृत जइं जिव्हेला, तत्स्तव तो त्यास आवडे कां न? ॥२७॥
होय हिरा मोक्षपथीं भक्ती, ही दे न तेज ती गार !
मोक्षाच्या क्षेत्राला नास्तिकपण तेंच होइ हो गार ॥२८॥
विद्यादेव भजाया तुह्मीं ठेवूं नका मुळीं पार ।
त्याच्या भक्तीनौके व्हाल भवार्णव तुह्मींच तो पार ॥२९॥
विद्यानाथा स्तविता कार्यीं कांहीं जरीहि ये हार ।
तर्ही उद्यम करणें, तेणें विजयाश्रि घालिते हार ॥३०॥
विद्यानाथा तुह्मीं प्रेमें भक्त्याच नित्य गा ! गावें ।
कोमलचरणोत्पलरजिं तुह्मी त्याच्या सदाच लोळावें ॥३१॥
आनंद कसा वर्णावा त्यावेळींचाच अज्ञ म्यां पतितें ।
दुर्बल मज्ज्ञान असे लिहितां ने ये कसा लिहूं गीतें ॥३२॥
मामा, भर्ता, चुलता, बाप, गुरू, मित्र होय एक जसा ।
ब्रह्मा, विष्णू, शंकर, देव गजानन असेच एक तसा ॥३३॥
कोणी स्तविती विष्णू, शूली स्तविती कितेक ब्रम्ह्याला ।
विद्यानाथा स्तवितो आवडता होय तोच आह्मांला ॥३४॥
गर्वोद्धत दैत्य अशा सर्वांतें जो करीच निःशेष ।
जयदेवा द्वैमातुर ! विघ्नें हर हीच अर्थना एक ॥३५॥
गव्य करी द्विज भूमीं पूत वरी नाम ते गणेशाचे ।
जन्माचा फेराही वारिति जप नित्य मात्र नामाचे ॥३६॥
मूर्ख परी आलों मी शरण तुला पादकैरवां दावी ।

खल्वाटासम भास्कर किरणीं, संसारसागरीं जाई ॥३७॥
मुखरत्वाचा येतो दोष, खरा, पादपद्मरज दहो ।
खड्ग जसें कुसुमातें तोडी त्वत्पदसरोरुहीं वही ॥३८॥
गर्वोद्धतवरगंजन कार्य करी एकटाच हा देव ।
जागर हें ठेवावें सर्वांनीं मानसीं, नको हाव ॥३९॥
आशाचक्र भयंकर गरगर फिरवीच भोंवरा जैसा ।
आशापाशा नाशी भक्त असावा गजानना ऐसा ॥४०॥
ध्यानीं, मनीं, दिनीं वा रात्रीं जो नाम हेंच गाईल ।
होउनि गुणें अलंकृत मुक्तिपदासीच सत्य जाईल ॥४१॥
हेरंब असा माझा श्रेष्ठअसे सर्व देवयोनींत ।
भक्त जयाचा हो जो, भाग्यानें युक्त, तो न दोनींत ॥४२॥
इच्छा, निश्चय, भक्ती, सत्य गुरूद्योग, प्रेम, विश्वास ।
द्वैमातुरपदकमलीं होइल नर तोच वंद्य विश्वास ॥४३॥
इतुकें साध्य कराया मनुजातें एक जन्म हो अल्प ।
सप्तगुणी व्हायातें यत्न करी आशु, हाच संकल्प ॥४४॥
कां नरजन्म मिळावा ना मनुजा दानवास जो नित्य ।
'वांच्छा जशी मिळे फळ' न्याय असे खास सत्य हो ॥४५॥
गडोल करुणार्णाचा, ज्ञानपुष्करसागर ।
जगत्प्राण, तुला नाहीं, देवदेवास वंदितो ॥४६॥

## १३ पद्यकथा.

( हा इसाबचा अन्योक्तिकलापच आहे. यांत इसाबनीतींतील निवडक कथा दिल्या आहेत. त्या अत्यंत संक्षिप्त परंतु अत्यंत उत्तम व हितोपदेशी आहेत, यास्तव त्या लहान मुलांनीं पाठ कराव्या ह्मणजे गोष्टीबरोबर नीतितत्वांची ओळख होऊन त्यांचा स्पष्ट ठसा मनावर उमटेल व त्याचा हितकारक असाच परिणाम घडल्यवांचून राहणार नाहीं. शेवटील चरणांत तात्पर्य दिलें आहे हा यांचा विशेष आहे. )

### [ १ सिंह आणि उंदीर ]

धावे मूषक सुप्तसिंहवदनी; तेणें बहू त्रासला ॥
जागा होउनी मूषका धरुनिया मरावया लागला ॥
राजा ! फेडिन सोडितां त्वदुपकारा मी पुढें बोलला ॥
कारुण्यें; मग चालता निजगृहा मोदें पहा जाहला ॥ १ ॥
गेले ते दिन, सिंह एक दिवशीं जाळ्यांत तो सांपडे ॥
गर्जी सर्व दिशा, ध्वनि श्रवुनि तो बाहेर आखू पडे ॥
तोडी जाल समस्त, मुक्त करितां झाला अरण्याधिश ॥
' क्षुद्रांचा उपयोग भव्य; उपकारें विश्व होई वश ॥ २॥

### [ २ कोल्हा आणि बगळा ]

कंठीं खंडाचि आस्थिचा शिरुनिया टोचे शिवाच्या सदा ॥
'श्वेतांगा ! कृपयाच उद्धर' बका बोले नमूनी पदां ॥

'घालूनी तव चंचु खंड, तुजला देईन मी वित्त गा' ! ॥
काढी खंड; तदा वदे बक तया' दे वित्त मातें सगा' !॥३॥
डोळे लाल करून ओष्ट चघळी, दंतावरी दंतही ॥
घासोनी मग ओरडे, गुरगुरे, बोले बकाला,' .ही ॥
आलें मस्तक मन्मुखांतुन तुझें हें भाग्य वृक्षालय' ! ॥
दुष्टांची करि, लाभ दुःख बरवें, सेवा तया हा नय ॥ ४ ॥

[ ३ कोल्हा आणि मेंढी ]

कूपीं तो पडला शृगाल सहसा येतां न येई वरी ॥
आली अंभ पिण्या अजा तृषित ती तेथेंच कालांतरीं ॥
आहे हें जल काय गोड'! वदतां मारी उडी मूर्ख ती ॥
ला हा अविचार—जंबुक वदे,' आलीस तू आपदीं' ॥ ५॥
गे नन्तर तो उपाय निघण्या; राही उभी ती अजा ॥
तत्पृष्ठावरि जात फेरव वरी गेला, 'करी गे! मजा' ॥
बोले तो तिजला, अजा विनविते, 'मूढे!' वदे तो 'जसें ॥
मूर्खत्वें करिलेंसि, भोग अधुना तैसाच भाळीं असे' ॥ ६ ॥

[ ४ बेडूक आणि त्यांचा राजा. ]

गोविंदाप्रति भेक जे अनृप भूपालार्थ ते याचिती ॥
देवानें गुरुकाष्टखंड दिधला होवोनी हृष्टा मती ॥
होता भव्य, पडे नभांतुनि तदा वाटे प्लवांना भिती ॥
त्यातें निश्चल पाहती; हस मनीं; त्याच्यावरी नाचती ॥ ७ ॥
कंटाळोनिच 'नूत्न भूप' ह्मणुनी ती प्रार्थना तत्कृत ॥
देवें कच्छप भूप उत्तम दिला—नाभेक संतोषित ॥

## १३ पद्यकथा.

( हा इसापचा अन्योक्तिकलापच आहे. यांत इसाप-नीतींतील निवडक कथा दिल्या आहेत. त्या अत्यंत संक्षिप्त परंतु अत्यंत उत्तम व हितोपदेशी आहेत, यास्तव त्या लहान मुलांनीं पाठ कराव्या म्हणजे गोष्टीबरोबर नीतितत्वांची ओळख होऊन त्यांचा स्पष्ट ठसा मनावर उमटेल व त्याचा हितकारक असाच परिणाम घडल्यवांचून राहणार नाहीं. शेवटील चरणांत तात्पर्य दिलें आहे हा यांचा विशेष आहे. )

### [ १ सिंह आणि उंदीर ]

धावे मूषक सुप्तसिंहवदनी; तेणें बहू त्रासला ॥
जागा होउनी मूषका धरुनिया मारावया लागला ॥
राजा ! फेडिन सोडितां त्वदुपकारा मी पुढें बोलला ॥
कारुण्यें; मग चालता निजगृहा मोदें पहा जाहला ॥ १ ॥
गेले ते दिन, सिंह एक दिवशीं जाळ्यांत तो सांपडे ॥
गर्जी सर्व दिशा, ध्वनि श्रवुनि तो बाहेर आखू पडे ॥
तोडी जाल समस्त, मुक्त करितां झाला अरण्याधिश ॥
' क्षुद्रांचा उपयोग भव्य; उपकारें विश्व होई वश ॥ २॥

### [ २ कोल्हा आणि बगळा ]

कंठीं खंडाचि अस्थिचा शिरुनिया टोचे शिवाच्या सदा ॥
'श्वेतांगा ! कृपयाच उद्धर' बका बोले नमूनी पदां ॥

'घालूनी तव चंचु खंड, तुजला देईन मी वित्त गा' ! ॥
काढी खंड; तदा वदे बक तया' दे वित्त मातें सगा' ! ॥३॥
डोळे लाल करून ओष्ट चघळी, दंतावरी दंतही ॥
घासोनी मग ओरडे, गुरगुरे, बोले बकाला,' .ही ॥
आलें मस्तक मन्मुखांतुन तुझें हें भाग्य वृक्षालय' ! ॥
दुष्टांची करि, लाभ दुःख बरवें, सेवा तया हा नय ॥ ४ ॥

[ ३ कोल्हा आणि मेंढी ]

कूपीं तो पडला शृगाल सहसा येतां न येई वरी ॥
आली अंभ पिण्या अजा तृषित ती तेथेंच कालांतरीं ॥
'आहे हें जल काय गोड'! वदतां मारी उडी मूर्ख ती ॥
केला हा अविचार–जंबुक वदे,' आलीस तू आपदीं' ॥ ५॥
सांगे नन्तर तो उपाय निघण्या; राही उभी ती अजा ॥
तत्पृष्ठावरि जात फेरव वरी गेला, 'करी गे! मजा' ॥
बोले तो तिजला, अजा विनविते, 'मूढे!' वदे तो 'जसें ॥
मूर्खत्वें करिलेंसि, भोग अधुना तैसाच भालीं असे' ॥ ६ ॥

[ ४ बेडूक आणि त्यांचा राजा. ]

गोविंदाप्रति भेक जे अनृप भूपालार्थ ते याचिती ॥
देवानें गुरुकाष्टखंड दिधला होवोनी हृष्टा मती ॥
होता भव्य, पडे नभांतुनि तदा वाटे प्लवांना भिती ॥
त्यातें निश्चल पाहती; हस मनीं; त्याच्यावरी नाचती ॥ ७ ॥
कंटाळोनिच 'नूत्न भूप' ह्मणुनी ती प्रार्थना तत्कृत ॥
देवें कच्छप भूप उत्तम दिला–नामेक संतोषित ॥

रागावे; बक ईशदत्तनृप तो भक्षी समस्तां प्लवां ॥
संतोषविण धावतांच विपदा येते' धडा मानवां ॥ ८ ॥

[ ५ सिंह आणि मनुष्य ]

ना, हर्यक्ष कदा प्रवास करता चित्राप्रती पातले ॥
'सिंहातें नर यत्र लोळवित तो होतें असें दावलें ॥
पंचास्या वदतो तदा नर 'पहा, आम्हां मनुष्या पहा' ॥
झालीं नम्र तयापुढें सकलही हीं श्वापदें सिंह हा' ॥ ९ ॥
सिंहानें शिर हालवून वदलें गंभीरतेनें 'खरें ॥
आहे जें वदसी सकारण असे, केला असे हा नरें ॥
होता हें उलटें जरी हरि करी, मर्त्यावरी केसरी ॥
'वाटे एक सुसत्य अन्य असतां अज्ञात' रीती खरी ॥ १० ॥

[ ६ दोन प्रवासी व अस्वल. ]

गेले दीर्घ निजप्रवास करण्या दोन प्रवासी पुरा ॥
जाती ते गहनांतरीं, सभय हा! ऋक्ष्यास भतींकरा ॥
वृक्षारोहणकार्य एक करिता झाला, दुजा बापडा ॥
राही मृत्युमुखीं; परी बघुनि हें तो घेत मोठा धडा ॥ ११ ॥
येई अस्वल, हुंगिते, पतित तो मेला असें वाटलें ॥
जाई ती दुसरीकडे, उतरले ते मित्र आतां भलें ( ? ) ॥
'दोस्ता! अस्वल काय' ?भीरु बदला' कर्णीं तुझ्या बोलली ॥
'नामें मित्र अनेक तत्वानिकषग्रावा तु तेषां विपद् ॥ १२ ॥

[ ७ सारथी आणि ईश्वर. ]

कोणी सूत रथास नेट असतां तच्चक्र भूमीं रुतें ॥
तेंव्हां तो रडला, सहाय्य सुवचें प्रार्थी मिळा विष्णुतें ॥

खांद्यानें रथ लोट, हाकत हया, झाली पशु प्रार्थना ॥
बोले विष्णुचि 'स्वावलंबन असे गोविंद आणी मना' ॥ १३

[ ८ हावरा मुलगा. ]

ध्याया मुष्टि भरून सर्व हलवा कीं काचकुंभांतुन ॥
यत्ना बाल करी; निघे कर न तो; लोभें न सोडी कण ॥
'अर्धा घे' वदतां कुणी, करित तो तैसे, तया लाभला ॥
सर्वग्रास करा क्षणीं न बघणें एक्या' धडा हा भला ॥ १४ ॥

[ ९ कोंबडा आणि रत्न. ]

कोणी कुक्कुट हिंडतां कण मिळायातें क्षुधा शांतवा ॥
'लाभे एक अमूल्य रत्न, वदला टाकून तें, घे यवा ॥
'बा! कोणा मनुजास आज मिळतां भालीं तुला ठेवते' ॥
'वस्तूतें उपयोग मूल्य असतो' हें बोलती जाणते ॥ १५ ॥

[ १० उत्तम वनराजा ]

होता एकचि काननाधिश महाविद्वान् अरण्यांतरीं ॥
'वागावें सम' तो वनांत पशुंना आज्ञा करी वैखरीं ॥
सिंह, व्याघ्र, शिवा, कुरंग, शशिही सौख्यें वनांत्न पहा ॥
'राजा एक वदेल शब्द मधु तो सौख्यार्थ लक्षांचिया' ॥ १६ ॥

[ ११ कुत्रा आणि त्याची छाया.

कोणी कुक्कुर मांसखंडमुख तो धावे जलाच्या वरी ।
पाही स्वप्रतिबिंब, अन्य दिसला श्वा मांस ज्याच्या मुखीं ।
खालीं ने मुख तद्ग्रहार्थ उघडी, गेला जलीं खंडही ।
'जो अतृप्त, परार्थलाभ धरि जो वा, स्वार्थही घालवी ॥ १७ ॥

[ १२ कांकडलेला सर्प. ]

शीतत्वें मरणोन्मुखा धरुनिया चक्रीस वक्षीं नर ।
कोणी ठेवितसे; तयास डसला पूर्वैस काकोदर ।
उष्णत्वें, गरले तदा मनुज तो मृत्यूमुखीं सांपडे ।
'शिक्षा योग्य मला, दया कृत कृतघ्नीं हें ह्मणोनी घडे ॥ १८ ॥

[ १३ पर्वताचा रोग. ]

कोणी पर्वत ओरडे यथिं महा आखू असे राहला ।
मोठ्यानें कण्हला, रडे घळघळा, सुस्कारिता जाहला ।
लोकीं कारण पृष्ट-मूषकवरी येतां जनीं पाहिला ।
'झाला तो उपहासपात्र करिता ढोंगा' कळे हें मला ॥ १९ ।

[ १४ कोल्ह्याचा विश्वासघात. ]

जोडी जंबुक सख्य रासभसवें अन्योन्यसंरक्षणा ।
पाहोनी गजराज आर्थप वधा बालेय दे कल्पना ।
नेई तो खर कर्दमीं; हरि तया दोघांसही भक्षितो ।
'लाभे संकट तेंच मित्रहि सुहृद्विश्वासघातास जो ॥ २० ॥

[ १५ कांसवाचें आकाशगमन. ]

पार्थीं त्रासुनि कूर्म वित्त गगनीं जाया गरुडा वरी ।
नेई उंच नभीं, फिरे खग, तया देई अद्रायोवरी ।
सोडोनी; पडलें जवें, कवचही गेलें चुरोनी तसें ।
'होई नाश अतीव लोभ करितां' तें मृत्युकालीं वदे ॥ २१ ॥

[ १६ मुलांबद्दल तंटा ]

कोणां पुष्कळ बालकें ह्मणुनिया तो वाद मोठा पडे ।
रानांतील पशूंत, निर्णय करा ते जात सिंही कडे ।

सिंही त्यास वदे,' असे मज खरा, छावा हरीचा असे ।
थोरांची महती वयांत अथवा संख्येंत कांहीं नसे ॥ २२ ॥

[ १७ पोपटाचा अविचार. ]

कोणी कीर अतीव लागुनि तृषा तोयार्थ वेगें उडे ।
जाई तो भवनीं, सुचित्र सरचें दृष्टीस त्याच्या पडे ।
घाली झांपचि, पक्ष मोडति तदा, तो पंजरीं सांपडे ।
जेथें हो बलवान् विकार अविचाराच्यामुळें हें घडे ॥ २३ ॥

[ १८ गव्हाणींतील कुत्रा. ]

होता निद्रित सारमेय यवसीं गोस्थानिं एका दिनीं ।
आला भद्र जिघत्सु एक धरुनी आशा तृणार्थी मनीं ॥
जागा होउनि ओरडे गुरगुरे, तो बैल जाई अतां ।
स्वार्थी राक्षस आत्मसौख्य बघती, अन्यहिता अंधता ॥ २४ ॥

[ १९ कावळ्याचा मूर्खपणा. ]

लक्षी काक बकास, तत्सम बना तो गौरदेही मनीं ।
वांच्छी, सोडुनि गांव दूर तटिनीतीराप्रती जा वनीं ।
पक्षांते परि धूत धूत असतां मेला बिचारा क्षुधें ।
'सौख्यानें स्थिति ईशदत्त वस' ही सत्योक्ति केली बुधें ॥ २५ ॥

[ २० मांजर व कोंबडा. ]

कुक्कूटा धरुनी पदीं मग वदे मार्जार ' भक्षी तुला ।
याचें कारण आरवोनि मनुजा तूं त्रास देसी मला ' ॥
' व्हाया जागृत; ' ' हें असत्य वदसी, ' गेलें मुखीं हें तसें ।
' दोषान्वेषणकार्य नीच करिती अन्या छळाया असें ' ॥२६॥

[ २१ गोष्टीदासाची बात. ]

दीर्घाध्वातित सांगतां निज बहू धैर्याचरीतें वदे ।
'होतों मी दशहस्त उंच उडलों'; साक्षी पुरावाहि दे ।
' राहो सर्व ' तदा वदे नर ' इथें दाखीव आह्मां बरें ।
नाहीं लागत कंकणास करिंच्या तो आरसा;' हें खरें ॥२७॥

[ २२ लोभी कोल्हा. ]

घे वस्ताजिन, आजकीं वसतसे तो भक्ष्य लाभे भलें ।
हो सूर्यास्त; गृहागताजक अजस्थानीं तदा कोंडलें ॥
येई छागप यामिनीं, धरि, चिरी तेथें अजा भोजना ।
होता जो वृक एक; ' लोभ सुमहा सर्वघ्न ' ये तन्मना ॥२८॥

[ २३ धनगराचा पोर व मेंढरूं ]

बोलावी अजपाल एक उरणा उन्मार्गगामी, न ये ।
मारी प्रस्तर खंड, शृंग पडलें, बोले' अजा! गे गये ।
सांगोनी न, करीं', तया अज वदे' हें शृंग सांगे खरें
'ठेवा गुप्त न गोष्ट यत्न करणें जी दृश्य' आहे बरें ॥ २९ ॥

( २४ वृद्ध मनुष्य व यम. )

नेई वृद्ध पुरुष इंधन पुरीं तें वन्य निर्वाह हो ।
त्रासे, जीवित दुःखयुक्त 'वदला, ये काळ येथें' अहो ।
आला काळ समक्ष 'काय? वदलीं, आतां वदे,' भार हा ।
दे मूर्धावर' जीवदान करणें तें भेय आहे महा ॥ ३० ॥

॥ श्रीगणेशार्पणमस्तु. ॥

# शुद्धिपत्र.

पुढील आंकडे अनुक्रमें पृष्ठ, ओळ व शब्द याकरितां आहेत.

२।१४।५-७. धूम्रवलयीं, वृक्षांतरी. ३।३।२-५। हेंच उत्तर असे वाणींत दुःखान्विता. ६।५।१-३। इथें श्रीछत्रेश-प्रवर. ७।१४।२-३। तिलक सत्कीर्ति ध्वजा. ७।१६।३-६। दरवळो विश्वीं सुगंधा भरो. ७।२०।२।७। दुःख तृतीय भक्ति मिनली चित्तीं उमाळा. ८।४।६-७। तुका किंवा. ९।१३।१-३। वालीचा घट सोडुनी पडसि भ्यालासि कीं ९।१५।२-५। तूं दिधली पुराण कविला सत्काव्य० १०।१०।६। महद्वांच्छा० १०।११ ५-८। अधनरां हे सेवितां धन्यता. १०।१७।१-५। रात्रीं पावक योग्य रूप धरिसी, लोकार्थ० ११।४।१-५। चोरांच नच साखळी नर दिनीं रात्रीं. ११।१०।४-५। स्त्रियाच. १३। ६।१-६। तंतूवाय मला अनन्य गमसी सज्जीव. १३।८।१-५। अल्पान्नाशनिं रूप दीर्घ, जवही; ऐशीं. १३।१०।४-७। नित्य-करती ती पादपूजा. १४।१०।४-७। ईश्वर सदा साधुस या. १४।१२।४-५। सरलें पुण्य. १७।११।६-९। नटना स्फूर्ती मनीं उद्भवे० ३०।१२।४-५। उपकृती ही. ३०।१७।४-६। अचला हो सूपकारें. ३५।७।५-६। सरतां तत्वज्ञता हें.

मुद्रक:-हु० रा०
हाटकर वं. जि. प्रेस
निपाणी, (बेळगांव.)

B. B.